महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,पालघर यांचे कार्यालय

## (गृह शाखा)


जिल्हा मुख्यालय, पालघर-बोईसर रोड, कोळगाव, ता.जि.-पालघर पिन कोड-४०१ ४०४

दुरध्वनी क्रमांक -०२५२५-२५३१११ Email ID: collectorpalghar@gmail.com/


क्र/गृह/का.१/टे.४/गणपतीगौरीउत्सव/वाहतूक नियंत्रण अधिसुचना/एस.आर-०५/२३ दि.१४/०९/२०२३

**वाचले**

१) मा.पोलीस अधीक्षक पालघर यांचेकडील पत्र क्र/६०५/२०२३ दि.१४/०९/२०२३.

२) मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५.

३) शासकीय अधिसुचना शासकीय अधिसुचना क्र.मो.वा.का.०५८९ सी.आर.-१०६१ टी.आर.अ.-२ दि.१९/०५/९० एम.जी.जी.४अ दि.२०/०९/९०.

अपर जिल्हा दंडाधिकारी पालघर जिल्हा पालघर

## वाहतूक नियंत्रण अधिसुचना

ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.१ अन्वये मा.पोलीस अधीक्षक पालघर यांनी दि.१९/०९/२०२३ रोजी ते २८/०९/२०२३ रोजीपासून गणपती उत्सव चालु होत असुन आगामी गणपती उत्सव दरम्यान बोईसर हे पश्चिम रेल्वेचे मोठे स्टेशन असुन दररोज सुमारे ४० ते ४५ हजार प्रवाशी रेल्वेने व इतर मार्गाने सुमारे ३५००० कामगार औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी येत असतात. तसेच दररोज इतर राज्यातुन बोईसर औद्योगिक वसाहतीत मोठया प्रमाणात मालवाहु जड-अवजड वाहने ये-जा करीत असतात. सदर वाहनांमुळे कोणतीही वाहतुक समस्या होवु नये याकरीता दि. १९/०९/२०२३ रोजी ते २८/०९/२०२३ रोजीपासून गणपती उत्सव चालु होत असुन दि. १९/०९/२०२३ रोजी गणपती आगमन दि. २०/०९/२०२३ रोजी दिड दिवस गणेश मुर्ती विसर्जन दि. २३/०९/२०२३ रोजी पाच दिवसांचे गणेश मुर्ती व गौरी विर्सजन दि. २५/०९/२०२३ रोजी सात दिवसांचे गणेश मूर्ती विसर्जन दि.२८/०९/२०१३ रोजी अनंत चर्तुदशी ११ दिवसांचे गणपती मुर्ती विर्सजन असल्याने व पालघर नगरपरिषद क्षेत्रात गणशोत्सव कालावधीत पालघर बोईसर रोड चाररस्ता ते पालघर रेल्वे स्टेशन व पालघर रेल्वे स्टेशन ते टेंभोडे मार्गे गणेशकुंड पर्यंत तसेच पालघर माहिम रोड स्वातंत्र्यवीर सावरकर चौक ते केनम स्कुल ते टेंभोडे मार्गे गणेश कुंड पर्यंत श्री. गणेशमुर्ती व गौरीमुर्ती विर्सजन मार्ग असुन त्या दरम्यान नागरीकांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असते. सदर गर्दीचे वेळी जड -अवजड वाहनांमुळे वाहतुकीची समस्या होवून अपघात होवु शकतो. याकरीता सदर मार्गावर सर्व जड-अवजड वाहनांना करीता गणपती विसर्जन मार्गात प्रवेश बंद बाबत अधिसूचना निर्गमित होणेकामी कळविले आहे.

त्याअर्थी, **मी सुभाष भागडे, अपर जिल्हादंडाधिकारी पालघर** मला उपोदघातातील अ.क्र. २ व ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन बोईसर व पालघर या शहरांमध्ये सदर आगामी गणपती उत्सव दरम्यान गणपती मुर्ती विसर्जन व गौरी मुर्ती विसर्जनाच्या वेळी दि.१९/०९/२०२३, दि. २०/०९/२०२३, दि.२३/०९/२०२२, दि.२५/०९/२०२३ व

दि.२८/०९/२०२३ रोजीपावेतो गणपती विसर्जन मार्गातील सर्व जड-अवजड वाहनांना पुर्णत: प्रवेश करण्यास मनाई करणेकामी खालील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसूचना जारी करीत आहे.

### बोईसर शहरांत येणारी जड-अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणारा मार्ग

१) तारापुरकडुन बस डेपो- बोईसर रेल्वे स्टेशन- नवापुर नाकाकडे येणारी सर्व जड-अवजड वाहने
२) पालघर कडून नवापुर रोड मार्गे बोईसर रेल्वे स्टेशन परिसरात येणारी सर्व जड- अवजड वाहने

### पालघर शहरात येणारी जड-अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणारा मार्ग

१) मनोरकडुन पालघर शहरात येणारी सर्व जड अवजड वाहने.
२) बोईसरकडुन चाररस्ता मार्गे व आंबेडकर चौकातुन पालघर शहरात येणारी सर्व जड- अवजड वाहने

### जड-अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणारा कालावधी

दि.१९/०९/२०२३ दि.२०/०९/२०२३ दि.२३/०९/२०२३, दि.२५/०९/२०२३, दि.२८/०९/२०२३

उपरोक्त मार्गावर दि.१९/०९/२०२३ दि.२०/०९/२०२३ दि.२३/०९/२०२३, दि.२५/०९/२०२३, दि.२८/०९/२०२३ **रोजी ००.०० वा.पासून ते २४.०० वा.पर्यंत** सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांस प्रवेश करण्यास बंद करण्यात येत आहे. सदरची वाहतुक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, महसूल विभागाची वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने, पोलिसांनी परवानगी दिलेली वाहने, उपविभागीय दंडाधिकारी व तालुका दंडाधिकारी यांनी परवानगी दिलेली वाहने यांना लागू राहणार नाही.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसूचना दि.१९/०९/२०२३ दि.२०/०९/२०२३ दि.२३/०९/२०२३, दि.२५/०९/२०२३, दि.२८/०९/२०२३ या संपुर्ण दिवसाकरीता अंमलात राहील.

सदरची अधिसूचना आज दिनांक १४/०९/२०२३ रोजी माझे सही शिक्यानिशी दिली असे.

(सुभाष भागडे)
**अपर जिल्हादंडाधिकारी पालघर**

प्रत:-

१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद पालघर यांना माहितीस्तव सादर.
२) मा.पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर.
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांना माहिती करीता व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४) उप विभागीय दंडाधिकारी पालघर यांना माहितीकरीता व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५) कार्यकारी दंडाधिकारी पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) मुख्याधिकारी, पालघर नगरपरीषद यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) विभागीय नियंत्रक, राज्य परीवहन पालघर विभाग, पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) जिल्हा माहिती अधिकारी, पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या प्रसिध्दीसाठी.